किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● हिंदोळा
५ ● अस्थिरतेकडून अनिश्चिततेकडे...?
१३ ● सुशासन आणि आर्थिक विकास
२१ ● भारतातील बिगर शेती रोजगाराचे चित्र
२७ ● जिकडे-तिकडे



**खंड १६ : अंक ७ ऑक्टोबर २०१७**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**


**वार्षिक वर्गणी २००/- रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ २०)** वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.


वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in



**अर्थबोधपत्रिका**
**खंड १६ (अंक ७) ऑक्टोबर २०१७**
**संपादक - अभय टिळक**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.


●अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# हिंदोळा

'अर्थबोधपत्रिके'च्या कुटुंबातील सगळ्यांनाच दिवाळीच्या आणि नव्याने साकारलेल्या संवत्सराच्या हार्दिक शुभेच्छा. हे नवीन संवत्सर आपल्या सगळ्यांना आनंदाचे, सुखसमाधानाचे, समृद्धीचे, भरभराटीचे आणि मुख्य म्हणजे उत्तम आरोग्याचे ठरो. आज सगळ्यांत महत्त्वाचे ठरते आहे ते आपले आरोग्य. तेही केवळ शारीरिक नव्हे; तर, सांस्कृतिक, मानसिक आणि भावनिकही. कारण, मनबुद्धीची निकोप शांती पदोपदी ढळवणा-या घटनाप्रसंगांची मालिकाच सभोवती सतत जन्म पावत असल्याचे आपण अनुभवत आहोत. एक प्रकारची विचित्र दिशाहीनता जाणवते आहे, असे जाणवत राहते. आपण सगळेच जगतो आहोत, सकृद्दर्शनी सगळे ब-यापैकी सुरळीत चालले आहे, हे खरे. पण या जगण्याला काही एक दिशा आहे, असे मात्र म्हणवत नाही. भांबावल्यासारखे झालेले आहे. पणत्या कितीही उजळायच्या म्हटले तरी परिसरातील काळोख इतका आणि असा घनदाट आहे की, दीपामधून स्त्रवणा-या मंद प्रकाशाने त्याचे निराकरण घडून येण्याऐवजी प्रकाशावरच घनतमाचे पालाण पडते आहे किंवा कसे, अशी भयशंका मनामध्ये दाटून येते. म्हणजे, सगळेच काळवंडलेले आहे, असेही नाही. अगदी खरे सांगायचे तर आशा-निराशांचा जणू हिंदोळाच बांधलेला आहे आपल्या दारी. वाढती स्पर्धा, प्रचंड धावपळीचे बनलेले जगणे, दिवसेंदिवस उग्र बनत चाललेला जीवनातील संघर्ष, त्यांतून दाटणारी प्रगाढ असुरक्षिततेची भावना, त्या असुरक्षिततेवर मात करण्याच्या ऊर्मीतून जागणारी अनाठायी आक्रमकता, तिच्यापायी शबल होत चाललेली शांती आणि या सगळ्यांचा एकत्रित परिपाक म्हणून की काय सगळ्याच समाजमनाला घेरून-व्यापून राहिलेली अनाम अस्वस्थता... आपले आजचे वास्तव इतके गुंतागुंतीचे बनलेले आहे. ही व्यामिश्रता अंगावर आली की हतबल निराशेच्या वजनाने हिंदोळा खाली जातो. वाटते की आता ही सगळी घसरण अशीच चालू राहणार. पण ही भावनाही पुन्हा चिरकाल टिकणारी नसते. मनाची उमेद वाढवणा-या किती तरी लहानलहान गोष्टी आजूबाजूला घडत असतात. मरगळलेल्या मनाला त्यांतून उभारी मिळते.



प्रतिकूलतेचा वेढा पडूनही हिंमत न हरलेली माणसे भेटत राहतात. उत्साह संपूनच जावा असेच सगळे फासे उलटे पडत राहूनही त्यांची जिगर अणुमात्रही उणावलेली नसते. पाषाणाच्या चिरेबंदी मुठीतून वर मान काढत वा-याच्या झुळुकांवर डौलाने डोलणा-या पिंपळाच्या कोवळ्या, लालसर, तलम-मुलायम रोपट्यासारखी जिजीविषा अभंग असणा-या व्यक्ती आणि प्रवृत्ती आसपास दिसल्या की उमेदीचा झोका पुन्हा एकवार आभाळ गाठण्यासाठी इरेसरीने झेपावतो. म्हणूनच तर आपण माणसाच्या जीवनप्रवासाला हिंदोळ्याची उपमा देत असतो. उतरणीला लागलेला झोका पुन्हा वर जाण्यासाठीच खाली येत असतो. त्यासाठी साधना करावी लागते तितिक्षेची. मनाशी चालू असलेला आपला संवाद बुलंद राखावा लागतो, तो तेवढ्याचसाठी. आंतरिक आत्मसंवाद शाबूत राखला की बाहेरच्या जगातील लोकसंवाद खंडित होण्याची भीती मावळते. आत्मसंवाद टिकवून धरण्याची कसरत म्हणजेच आपले जगणे नाही का ! ●●

**वाचकांना विनंती**

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

**निवेदन**

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्‌धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आर्थिक

# अस्थिरतेकडून अनिश्चिततेकडे...?

अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये निपजलेल्या 'सब्प्राइम' कर्जांच्या अरिष्टाचे गळू फुटल्याला यंदाच्या १५ सप्टेंबर रोजी नऊ वर्षे पूर्ण झाली. १५ सप्टेंबर २००८ या दिवशी लेहमन ब्रदर्स या अमेरिकेतील एका बलाढ्य वित्तसंस्थेने दिवाळखोरी जाहीर केली आणि 'सब्प्राइम' कर्जांचा फुगा फाटदिशी फुटला. यंदाच्या १५ सप्टेंबर २०१७ रोजी त्या अरिष्टाने १०व्या वर्षात पदार्पण केले. २००८ साली बसलेल्या दणक्यातून वैश्विक अर्थव्यवस्था आज नऊ वर्षांनंतर ब-यापैकी सावरलेली आहे. तरीही, वित्तीय अरिष्टाचे सावट पडण्यापूर्वीचे अर्थचित्र आजघडीला जगातील एकाही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये दिसत नाही. वित्तीय अरिष्टपूर्व परिस्थिती केव्हा अवतरेल यांबद्दलचे आजवरचे अंदाजही ब-यापैकी हुकलेले आपण बघितले. गेल्या नऊ वर्षांदरम्यान जगभर सर्वत्रच आर्थिक आघाडीवर अस्थिरतेचा माहौल नांदला. देशोदेशींच्या अर्थव्यवस्थांच्या आगेकूचीचा वार्षिक सरासरी दर या काळात अस्थिर राहिला. ती सारी अस्थिरता अंमळ कमी होत स्थैर्याची चाहूल लागायला सुरुवात अलीकडील दोन ते तीन वर्षांत झालेली होती. त्यांमुळे, जागतिक समुदाय सुटकेचा निश्वासही टाकू बघत होता. परंतु, तरीही सगळे काही आलबेल आहे, असे म्हणता येण्यासारखे वातावरण कोठेही नाही.

'सब्प्राइम' कर्जांच्या अरिष्टातून निपजलेल्या मंदीचे मळभ हळूहळू विरळ होऊ लागलेले असले तरी भविष्यासंदर्भातील अनिश्चितता मात्र अजूनही गडद आहे. जगभरातील अर्थतज्ज्ञांना आज विस्मय वाटताना दिसतो तो नेमका याच बाबीचा. मंदीमुळे निर्माण झालेली अस्थिरता विलय पावल्यानंतर वैश्विक अर्थव्यवस्था सावरेल अशी जी अपेक्षा बाळगली जात होती तिला तडा जातो आहे. नजीकच्या भविष्याबाबतची अनिश्चितता कधी दूर होईल, यांबाबत आज कोणीही छातीठोकपणे काहीच सांगू शकत नाही. सगळ्यांत मोठे आव्हान, त्यांमुळे, आज आहे ते या अनिश्चिततेचे.



त्यांमुळे, आता नव्याने येऊ घातलेल्या २०१८ या वर्षात जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा सरासरी वेग काय राहील, यांबाबत चालू कॅलेंडर वर्षाच्या सुरुवातील मांडले गेलेले आडाख्यांचे पुनर्विलोकन करण्याचे काम चालू झालेले दिसते. २०१७ या आता संपायला आलेल्या वर्षात जागतिक अर्थव्यवस्था साधारणपणे साडेतीन टक्क्यांनी वाढलेली असेल असा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने सुरुवातीला वर्तवलेला होता. आता, यांबाबतही पुन्हा जागतिक स्तरावरील संस्थांमध्ये एकवाक्यतेचा अभाव दिसतो. कारण, २०१७ या वर्षात जागतिक अर्थव्यवस्थेच्या उत्पादनात २.७ टक्क्यांचीच वाढ संभवते असे अनुमान संयुक्त राष्ट्रांनी प्रकाशित केलेल्या आर्थिक अहवालात म्हटले होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या भाकितानुसार, २०१८ या वर्षात जागतिक अर्थव्यवस्थेतील एकंदर उत्पादन ३.६ टक्क्यांची वाढ नोंदवेल. तर, संयुक्त राष्ट्रांनी मांडलेल्या अंदाजानुसार ही वाढ असेल २.९ टक्क्यांची. म्हणजेच, २०१८ सालातील संभाव्य अर्थचित्राबाबत जागतिक स्तरावरील अभ्यासही चाचपडताना दिसतात. अर्थात, दोन संस्थांनी केलेल्या भविष्यकथनामध्ये एकच एक सूर उमटेल याची शाश्वती गृहीत धरता येत नाही. तरीही, २०१७ या वर्षाच्या तुलनेत २०१८ या वर्षातील संभाव्य वाढीची मात्रा या दोन्ही संस्था अल्पस्वल्पच दाखवतात हे वास्तव सध्याच्या अर्थचित्राला लाभलेल्या चौकटीला चिकटलेल्या अनिश्चिततेकडे निर्देश करतात हे वास्तव नजरेआड करता येत नाही.

जगाच्या पाठीवरील काही प्रमुख देशांच्या अर्थव्यवस्थांबाबत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जी भाकिते मांडलेली आहेत, ती या संदर्भात अधिकच मननीय ठरतात. जगातील विकसित देशांच्या समूहांच्या अर्थव्यवस्था २०१७ या वर्षात दोन टक्क्यांची वाढ नोंदवतील असे नाणेनिधीचे भाकित आहे. मात्र, २०१८ या येत्या वर्षात विकसित राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था १.९ टक्क्यांनीच वाढतील, असे नाणेनिधीचे कथन सांगते. त्यांच्या तुलनेत बरीच बरी कामगिरी उभरत्या आणि विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांची राहील. कारण, या गटातील देशांच्या अर्थव्यवस्था चालू वर्षात ४.६ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. तर, २०१८ या येत्या वर्षात संभाव्य वाढीची ही मात्रा नाणेनिधीच्या अंदाजानुसार ४.८ टक्क्यांची असेल.

**अनिश्चिततेचे तीन स्त्रोत**

या सगळ्यांतील मुख्य गंमत आहे ती निराळीच. उभ्या जागतिक अर्थकारणाचा तोल आजवर मुख्यतः निर्भर राहिलेला आहे तो अमेरिका आणि चीन या दोन बलदंड भिडूंच्या अर्थव्यवस्थांवर. २०१७ या चालू वर्षांत अमेरिकी अर्थव्यवस्थेतील एकंदर उत्पादन २.३ टक्क्यांची वाढ नोंदवेल असे अनुमान आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने या वर्षाच्या सुरुवातीस मांडले होते. मात्र, आता अमेरिकी अर्थव्यवस्था २.१ टक्क्यांचीच वाढ नोंदवेल असे नाणेनिधीचा अंदाज आहे. मुख्य म्हणजे, २०१८ या वर्षात अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या आगेकूचीचा दर २.१ टक्के इतकाच राहील, असे नाणेनिधीचे भविष्यकथन आहे. ब्रिटिश अर्थव्यवस्थेबाबतही यांपेक्षा फारसे निराळे चित्र संभवत नाही. जागतिक अर्थकारणाचा दुसरा आधारस्तंभ असलेल्या चीनच्या संदर्भातही फारशी आशादायक म्हणावी अशी स्थिती संभवत नाही. २०१७ साली ६.७ टक्क्यांची वाढ नोंदवणे अपेक्षित असलेली चिनी अर्थव्यवस्था २०१८ साली ६.४ टक्क्यांनी वाढेल असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे सूचन आहे. म्हणजे, चीनच्या बाबतीतही वाढीची मात्रा यंदाच्या तुलनेत घटावी, असाच कयास आहे. त्यांतल्या त्यांत बरी परिस्थिती दिसते ती फ्रान्स, जर्मनी, इटली आणि स्पेन या युरोपीय समुदायातील देशांच्या अर्थकारणाची. अर्थात, त्यालाही मर्यादा आहेत कारण, युरोपीय समुदायातील अन्य देशांच्या अर्थकारणाचे रागरंग येत्या काळात कसे राहतील त्यांच्या चौकटीत या मूठभर युरोपीय देशांच्या अर्थचित्राचे परिशीलन करावे लागेल.

भविष्याबाबतचे कोणतेच अंदाज तंतोतंत आणि १०० टक्के खरे ठरतात वा ठरतील असे कधीच होत नाही. परंतु, येत्या काळात वैश्विक स्तरावरील अर्थकारणातील संभाव्य पुनरुत्थानाबाबत ज्यानेत्याने कितपत गुलाबी चित्र मनाशी रंगवावे, यांबाबत पाय जमिनीवर राहावेत यासाठी ही सगळी आकडेवारी उपयुक्त ठरते. कारण, अर्थकारणातील घडामोडींना व्यापक चौकट लाभत असते ती राजकीय आणि सामाजिक घटितांची. आर्थिक अस्थैर्याला आणि त्यांतून आता निपजत असलेल्या आर्थिक अनिश्चिततेला जागतिक समुदायाचे मानस कशा प्रकारचा प्रतिसाद देते त्यांवर भविष्यातील अर्थकारणाचा चेहरामोहरा अवलंबून असेल.



त्या दृष्टीने, येत्या काळात वैश्विक स्तरावर तीन मुख्य प्रवाहांकडे नीट लक्ष ठेवावे लागेल. अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांचे अर्थविषयक धोरण हा त्यांतील अग्रमानांकन लाभलेला घटक. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील सध्याची मरगळ हटवण्यासाठी येत्या काळात ट्रम्प विस्तारवादी, उदार असे राजकोषीय धोरण अवलंबतील असे म्हटले जाते. करदरांमध्ये सरासरीने कपात घडवून आणणे, हा त्या धोरणाचा संभाव्य गाभा असू शकतो. आता, अमेरिकी अध्यक्ष खरोखरच असे धोरण राबवतील का, यांबाबत आजतरी चित्र अंधुकच आहे. एकंदरीनेच, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील कररचना आणि दरपद्धती, सरकारी खर्चासंदर्भातील धोरण यांबाबत येत्या काळातील चित्र कसे असेल त्यांवर अमेरिकी अर्थव्यवस्थेचे आणि पर्यायाने जागतिक अर्थव्यवस्थेचे चित्र निर्भर राहील. करदर घटवल्याने सर्वसाधारण अमेरिकी नागरिकाच्या खिशामध्ये अधिक पैसा राहून परिणामी त्याची क्रयशक्ती वाढावी, अशी भूमिका विस्तारवादी राजकोषीय धोरणामागे दिसते. त्यांमुळे, अमेरिकी नागरिक हिरिरीने बाजारपेठेत खरेदीसाठी उतरून त्यांद्वारे अमेरिकी अर्थकारणातील 'इफेक्टिव्ह डिमांड' उंचावेल आणि त्यांतून रोजगारनिर्मिती, नवीन गुंतवणूक यांची चाके फिरायला लागतील, असा अर्थशास्त्रीय तर्क त्याच्या मुळाशी आहे. सरकारी खर्चामध्ये वाढ घडवून आणण्याच्या विचाराचे अर्थशास्त्रीय अधिष्ठानदेखील तेच.

कागदोपत्री हा अर्थशास्त्रीय तर्क बेलाग असला तरी व्यवहारात त्याचे नेमके परिणाम कसे घडून येतील यांबाबत काहीच सांगता येत नाही. करांच्या दरांत कपात घडवून आणण्याने तसेच सरकारी खर्चाबाबत हात सढळ ओणवा करण्याने अमेरिकेची वित्तीय तूट कशी व किती वाढेल यांबाबत आज काहीच अंदाज करता येत नाही. तुटीचा आकडा फुगला की त्याचे परिणाम अमेरिकी अर्थव्यवस्थेतील महागाईच्या सरासरी प्रमाणावर जाणवावेत, हे ओघानेच येते. त्या परिस्थितीत मग, व्याजदरांची सरासरी पातळी उंचावण्याच्या दिशेने अमेरिकी धोरणकर्त्यांनी पावले उचलली तर त्याचे पडसाद सगळ्या जगात उमटतील. विकसनशील देशांमधील भांडवल बाजारांत आजवर 'पार्क' करून ठेवलेला पैसा पुन्हा मग अमेरिकी अर्थव्यवस्थेकडे तोंड फिरवेल.

तसे उद्या खरोखरच झाले तर, विकसनशील देशांमधील भांडवल बाजारांतच केवळ नव्हे तर सोने, जमीन, घरे व बांधकाम यांसारख्या बाजारपेठांमध्येदेखील फेरजुळणी सुरू होईल. मुख्य म्हणजे, विकसनशील देशांच्या चलनांचे अमेरिकी डॉलरबरोबरील आजचे जे विनिमय मूल्य आहे त्यांत बदल घडून येईल. त्यांतून, त्या त्या देशांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या ताळेबंदात पडसाद उमटतील. ही सगळी फेररचना नेमकी कशी असेल हे अमेरिकी अर्थव्यवस्थेत येत्या काळात कशा प्रकारची धोरणे राबविली जातील त्यांवर अवलंबून राहील. दुसरीकडे, युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याचा निर्णय ब्रिटनने घेतल्यामुळे आता त्या संदर्भातील हालचाली चालू झालेल्या आहेत. ब्रिटनबाहेर पडल्यानंतर युरोपीय समुदायाची जी काही फेरघडण अपरिहार्य ठरते त्या संदर्भातील वाटाघाटींचे फलित काय राहील, यांबाबत आज असलेली धूसरता हा वैश्विक अर्थकारणाला सध्या जाणवणा-या अनिश्चिततेच्या वास्तवाचा दुसरा पैलू अथवा कोन. अनिश्चिततेचे पटल गडद बनविणारा तिसरा कोन अथवा पैलू म्हणजे भू-राजकीय संभाव्य अस्थिरतेचा. त्या संदर्भात तर कोणीच काहीही बोलू शकत नाही.

या सगळ्या वातावरणाचा फटका बसतो आहे तो खासगी गुंतवणुकीला. त्यांमुळे, गुंतवणुकीचे गाडे खिळलेले आहे. अशा सगळ्या अनिश्चिततेपायी आणि २००८ सालापासून आजवर नऊ वर्षे नरम राहिलेल्या अर्थकारणामुळे गुंतवणूक आणि नफाप्रदता यांच्यातील सहसंबंध जगभरातच विकळ झालेला आहे. त्यांमुळे, नव्याने मोठी गुंतवणूक करण्याची जोखीम पत्करण्यास कॉर्पोरेट विश्व आज सगळीकडेच अनुत्सुक आहे. मुळात, नवीन गुंतवणूकच होत नसल्याने रोजगारनिर्मिती ठप्प आहे. त्याचा फटका बसतो आहे क्रयशक्तीला आणि पर्यायाने बाजारपेठेतील मागणीला. या सगळ्यांचा एकत्रित प्रतिकूल परिणाम जाणवताना दिसतो तो आर्थिक विकासाच्या सरासरी वेगावर. आर्थिक वाढीचा वेग मंदावलेला असल्याने देशोदेशींच्या सरकारांना महसुलाची चिंता भेडसावते. त्यांतून तुटीचे आव्हान उग्र बनते. या वास्तवाचा आणखी आणि कदाचित सर्वाधिक गंभीर धोका म्हणजे अर्थकारण मलूल राहिल्याने संरक्षणवादी आर्थिक राष्ट्रवादाला खतपाणी मिळून त्याची परिणती जागतिक व्यापार आक्रसण्यात होते आहे.



अमेरिकी ‘सब्प्राइम’ कर्जांच्या फुटलेल्या फुग्यातून पसरलेल्या आर्थिक संकटानंतर जागतिक अर्थकारणात अवतरलेली मरगळ आज नऊ वर्षांनंतरही रेंगाळल्याने भविष्यातील अर्थचित्राबाबतची अनिश्चितता अधिक गहिरी बनलेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विश्लेषणानुसार, ही मरगळ न हटण्याची कारणे गुंतागुंतीची आणि परस्परांशी गुंफलेली आहेत. पहिले म्हणजे, एकंदरीनेच जागतिक स्तरावर उत्पादकता आणि उत्पादकतेमधील वाढीचा वार्षिक सरासरी दर आज चांगल्यापैकी खालावलेला आहे. उत्पादकता वाढ खुरटलेली असल्याने कामगारांच्या वेतनवाढीला त्याचा तीव्र फटका बसलेला आहे आणि तो आजही बसतोच आहे. मेहेनताना वाढत नसल्याने अथवा/किंवा मेहेनतान्यातील वाढीचा वेग मंदावलेला असल्याने खिशातून पैसा बाहेर काढून खर्च करण्याची मानसिकता खचलेली आहे. बाजारात उठावच नसल्याने महागाईचा प्रश्नच नाही. मात्र, आर्थिक उभारी आणि मुख्य म्हणजे उत्पादक व गुंतवणूकदार यांना उमेद देईल इतपतही किंमतींची सरासरी पातळी वाढीची प्रवृत्ती दाखवत नसल्याने गुंतवणुकीचे गाडे जागच्याजागी रुतलेले आहे. खासगी गुंतवणूक हालत नसल्याने देशोदेशींच्या सरकारांनाच अर्थव्यवस्थेत जान फुंकण्याची जबाबदारी पेलणे अपरिहार्य ठरते आहे. त्यासाठी पैसा उभा करण्याची जबाबदारी पुन्हा ठरते ती सरकारचीच. उत्पादनवाढीचा वेग मंदावलेला असल्यामुळे सरकारांच्या महसूल संकलनाला चटके बसत आहेत. त्यांत भरीस भर म्हणून अर्थव्यवस्थेला सरकारी खर्चाचे इंजेक्शन टोचायचे. या सगळ्याची अपरिहार्य परिणती वित्तीय तूट वाढण्यात घडून येते. मग ती तूट भरून काढण्यासाठी सरकारला पुन्हा कर्जउभारणी करणे भाग पडते. सरकारच्या तिजोरीवर कर्जांचा बोजा चढला की व्याजाचा भरणा सुरू होतो. त्यांतून सरकारच्या महसुली खर्चाची आणखी एक बाब बळावते. मग, महसुली खात्यावरही तुटीची दरी नांदू लागते. साहजिकच, ती तूट भरून काढण्यासाठी पुन्हा कर्जे घ्यावी लागतात. अशा कर्जांचा विनियोग अनुत्पादक कारणांसाठी होत राहण्याने सरकारी तिजोरीवरील भार हलका होण्याच्या शक्यता ज्या प्रमाणे दुरावतात त्याचप्रमाणे भांडवली खर्चाला कात्री लागून अर्थव्यवस्थेतील उत्पादक क्षमतांचे भरणपोषणही खुंटते. आजचे सगळे दुष्टचक्र असे आहे.

**गंभीर आव्हान चिवट बेरोजगारीचे**

सर्वत्रच सरासरीने क्षीण बनलेल्या आर्थिक विकासाचा सर्वांत गंभीर आणि तीव्र तडाखा जाणवतो आहे तो रोजगारनिर्मितीला. मंद बनलेली रोजगारवाढ, त्यांतच खुरटलेली उत्पादकता आणि उत्पादकतावाढीचा वेग खचल्याने मंदक्षीण झालेली वेतनवाढ या सगळ्यांचा एकत्रित प्रतिकूल परिणाम घडून येतो आहे तो कुटुंबांच्या कल्याणावर. नवीन गुंतवणूक घडून येत नसल्याने भांडवली वस्तूंना सध्या उठाव नाही. श्रमिकांच्या सरासरी उत्पादकतेवर सावट येते आहे ती नेमकी त्याचीच. श्रमिकांच्या उत्पादकतावाढीचा वेग ढासळलेला असल्याने त्यांच्या मेहेनतान्यातील वाढही रोडावलेली आहे. साहजिकच, उपभोगावरील खर्चाबाबत सर्वसामान्य नोकरदार हात आखडता घेताना दिसतो. त्याची झळ बसते आहे बाजारपेठेतील मागणीला. मागणीच मलूल असल्याने नवीन गुंतवणूक करून प्रस्थापित उत्पादनक्षमतेमध्ये वाढ घडवून आणण्याबाबत कारखानदार अनुत्सुक आहेत. त्यांमुळे गुंतवणुकीचे चक्र गतिमान होण्यात अडथळे निर्माण होत आहेत. साहजिकच, नोक-या निर्माण होणार तरी कोठे, असा प्रश्न यांतून निर्माण होतो. आजमितीस, जागतिक स्तरावरील मुख्य समस्या हीच आहे. त्यांतल्या त्यांतही अधिक दाहक प्रश्न आहे तो होतकरू तरुणांमधील बेरोजगारीचा. जागतिक स्तरावरील एकंदर बेरोजगारांपैकी जवळपास ३५ टक्के बेरोजगार २०१६ साली वय वर्षे १५ ते २४ या वयोगटातील होते.

बेरोजगारीच्या या समस्येला आणखीन दोन उपपैलू आहेत. मिळालेल्या रोजगाराची हमी अथवा सुरक्षितता हा झाला त्या दोहोंतील पहिला पैलू. तर, याच समस्येचा दुसरा पैलू आहे तो नव्याने उपलब्ध होत असलेल्या रोजगाराच्या गुणवत्तेचा अथवा उत्पादक दर्जाचा. स्वयंरोजगाराचा पर्याय चोखाळणारे आणि/अथवा घरगुती उद्योगातच काही तरी योगदान देणारे असे श्रमिकांचे दोन गट सर्वार्थाने 'व्हल्नरेबल' गणले जातात. वैश्विक अर्थकारणात २००८ सालानंतर उद्भवलेल्या अस्थिरतेचा सर्वांत क्रूर फटका श्रमिकांच्या गटातील नेमक्या याच दोन उपगटांना आजवर बसत आलेला आहे. ज्या विकसनशील देशांत सामाजिक सुरक्षा कवचांची वानवा आहे तिथे तर चित्र अधिकच दाहक दिसते.



रोजगाराच्या स्थैर्याची कोणत्याही प्रकारची हमी नाही आणि त्यांमुळे साहजिकच मेहेनतानाही अस्थिर हे वास्तव 'व्हल्नरेबल' गटातील श्रमिकांच्या पुढ्यात नित्याचेच ठाकलेले आहे. श्रमिकांच्या अशा 'व्हल्नरेबल' गटात समाविष्ट असणा-यांचे एकूण श्रमिकांतील प्रमाण जागतिक स्तरावर २०१६ साली जवळपास ४६ टक्क्यांइतके मोठे होते. परिणामी, अलीकडील काळात महागाईचा वार्षिक सरासरी दर नेमस्त राहूनही या गटातील श्रमिकांच्या हलाखीत घट झालेली अनुभवायला येत नाही. खरे पाहता, कोठेही महागाईचा फणा सध्या उगारलेला नसल्याने कामगारांच्या वास्तव वेतनमानात वाढ घडून येणे अपेक्षित आहे. परंतु, वास्तव नेमके उलटे आहे. वास्तव वेतनदरात वाढ तर सोडाच, परंतु, प्रत्यक्षात घसरणच दिसते. याचा अर्थ एवढाच की, श्रमांच्या बाजारपेठेत जो काही रोजगार जिथे कोठे निर्माण होतो आहे तो गुणात्मकदृष्ट्या निम्न अथवा हिणकस स्वरूपाचा आहे. रोजीरोटी कमावण्याच्या नव्याने तयार होत असलेल्या संधी या अल्प मेहेनताना देणा-या, म्हणजेच, अल्पकुशल स्वरूपाच्या, बव्हंशी अर्धवेळ काम देणा-या आणि त्यांही मुख्यत्वे कंत्राटी तत्त्वावरील असल्या पाहिजेत एवढाच निष्कर्ष या सगळ्या चित्राद्वारे निघतो.

अगदी अमेरिकेसारखी बलाढ्य अर्थव्यवस्थाही याला अपवाद नाही. २००८ साली निपजलेल्या आर्थिक अरिष्टानंतर तिथे धाडकन वाढलेली बेरोजगारी आज नऊ वर्षांनंतर जवळपास अरिष्टपूर्व पातळीपर्यंत खाली आलेली दिसते. ज्याला अर्थशास्त्रीय तांत्रिक परिभाषेमध्ये 'बेरोजगारीचा नैसर्गिक दर' असे संबोधले जाते त्या दरापाशी अमेरिकी अर्थव्यवस्थेतील बेरोजगारीचा दर आजमितीला स्थिरावलेला आहे. तरीही अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या पुढ्यातील संकटाचे निराकरण पूर्णपणे झालेले आहे, असे म्हणवत नाही. कारण, पूर्ण वेळ नोकरी करण्याची तयारी असलेल्या परंतु पूर्ण वेळ काम न मिळालेल्यांचे प्रमाण आजही तिथे बरेच मोठे आहे. केवळ इतकेच नाही तर, बराच काळ बेरोजगार राहिल्याने पुन्हा एकवार नोक-या मिळण्याच्या शक्यता हरपलेल्यांचे प्रमाणही खूप मोठे आहे. वैश्विक अर्थव्यवस्थेच्या प्रदीर्घ काळ रेंगाळलेल्या पुनरुत्थानाची सर्वाधिक चिंताजनक निष्पत्ती कोणती म्हणावी तर ती नेमकी हीच ! ●●

**प्रशासन**

# सुशासन आणि आर्थिक विकास

'गव्हर्नन्स' या इंग्रजी शब्दाला 'सुशासन' असा पर्यायी शब्द मराठी भाषेमध्ये योजला जातो. 'गव्हर्न्मेन्ट' आणि 'गव्हर्नन्स' या दोन संज्ञांचा आंतरसंबंध अतिशय निकटचा आहे. किंबहुना, 'गव्हर्नन्स' राबवणे अथवा 'गव्हर्नन्स' करणे हेच 'गव्हर्न्मेन्ट'नामक संस्थेचे गाभाकर्तव्य ठरते. लोककल्याणाचे कंकण बांधलेले कोणतेही सरकार सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणाची सर्वसाधारण पातळी उंचावत राहावी यासाठी अनंत प्रकारची धोरणे आखत आणि राबवत असते. सरकार अथवा शासन अथवा शासनसंस्था अंमलबजावणी करत असलेल्या धोरणांचे प्रत्यक्षातील परिणाम कसे व कितपत असतात हे त्या त्या व्यवस्थेतील 'गव्हर्नन्स'च्या गुणवत्तेवर निर्भर राहते. म्हणजेच, दुस-या शब्दांत सांगायचे तर, कोणत्याही देशातील वा समाजव्यवस्थेतील शासनसंस्था तिच्या कार्यक्षेत्रात राबवत असलेल्या विकासविषयक धोरणांची व्यवहारातील निष्पत्ती सुशासनाच्या मात्रेवर अवलंबून असते.

कोणत्याही देशात अथवा समाजात 'धोरण' नावाची चीज नेमकी निर्माण अथवा उत्क्रांत कशी होते, याचा अभ्यास करणे ही नेहेमीच रोचक बाब ठरते. त्याचप्रमाणे, अंमलबजावणी चालू झालेल्या धोरणांच्या परिणामांचा लेखाजोखा सतत मांडत राहण्यासाठी धोरणांच्या तामिलीला समांतर अशा पद्धतीने मूल्यमापन, संशोधन व दस्तऐवजीकरणाची काहीएक व्यवस्थाही निर्माण करावी लागते. शासनसंस्थेच्या इच्छाशक्तीचा व लोककल्याणाबाबत तिच्या ठायी वसणा-या कल्पकतेचा प्रत्यय सर्वसामान्यांना शासनसंस्थेने आखलेल्या धोरणांच्या माध्यमातूनच येत राहतो. लोकांच्या अपेक्षा आणि गरजा यांच्याशी शासनाने आखलेली धोरणे कितपत सुसंवादी आहेत हे अभ्यासणे जितके महत्त्वाचे तितकेच, त्या धोरणांची अंमलबजावणीही काटेकोरपणे होते आहे ना, हे बघत राहणे आवश्यक ठरते.



सरकारने मनाशी योजलेली काही एक साध्ये अथवा उद्दिष्टे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उपक्रम अथवा कार्यक्रम वा योजना, आखलेल्या योजनांची कार्यवाही करण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा, योजनांच्या अंमलबजावणीसाठी पुरेशा निधीची तरतूद, निधीच्या वापराबरोबरच योजनेच्या कार्यवाहीस पूरक अशी कायदेकानून व नियम यांची चौकट, योजनेच्या अंमलबजावणीस समांतर अशा प्रकारे तिच्या मूल्यमापनाची व्यवस्था, धोरणाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीदरम्यान उद्‌भवणा-या समस्यांचे अथवा तंट्यांचे निराकरण वेळच्या वेळी घडवून आणण्यासाठी व्यवस्थात्मक संरचना... अशा सा-या बाबींचा समावेश 'धोरण'नामक संज्ञेमध्ये होत असतो वा होणे अपेक्षित असते. सत्तारूढ सरकारच्या लोककल्याणासंदर्भातील राजकीय इच्छाशक्तीचा प्रत्यय धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी यांद्वारे नागरिकांना येत राहतो. सरकार राबवत असलेल्या धोरणांच्या व्यावहारिक फलनिष्पत्तीवरू नच त्या त्या देशातील नागरिक सरकारच्या कामगिरीची चिकित्सा करत राहतात. या सगळ्याचा सुशासनाशी विलक्षण जवळचा आणि जैविक संबंध आहे व असतो.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रु पये**

**समाजपुरु षाचा वारसा आणि वसा याचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**सहा बोलकी उदाहरणे**

नेमक्या याच कारणापायी जागतिक बँकेच्यावतीने दरवर्षी तयार करण्यात येणा-या जागतिक विकास अहवालासाठी (वर्ल्ड डेव्हलपमेन्ट रिपोर्ट) यंदाच्या वर्षी (म्हणजे, २०१७ या वर्षासाठी) निवडण्यात आलेले 'सुशासन आणि विकास' हे मध्यवर्ती सूत्र विलक्षण कळीचे ठरते. सुशासनाचा आणि आर्थिक वाढविकासाच्या प्रक्रियेचा संबंध किती कळीचा आणि बहुआयामी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी या अहवालाने अगदी सुरुवातीलाच, केवळ वानगीदाखल, नमूद केलेली पाच उदाहरणे कमालीची बोलकी आणि तितकीच उद्‌बोधक आहेत.

कमालीचे हिंसक प्रादेशिक संघर्ष आणि घुसखोरी यांनी सोमालियाला गेली दोन दशके पुरते जर्जर करून सोडलेले आहे. त्यांमुळे, जगातील एक अत्यंत संवेदनशील प्रदेश अशी सोमालियाची ख्याती. अशा या अस्थिरतेपायी कोणत्याही प्रकारची केंद्रवर्ती स्थिर सत्ता आजवर तेथे जम बसवू शकलेली नाही. एकमेकांशी सतत रक्तलांछित लढायांमध्ये गुंतलेल्या प्रादेशिक मनसबदारांमध्ये प्रबळ व स्थिर अशी केंद्रवर्ती सत्ता स्थापन करण्याबाबत मतैक्य न होणे हे त्यांमागील कारण. त्याच सोमालियामधील सोमालियालॅन्ड हा एक स्वायत्त उपप्रदेश. वरकड सोमालियाप्रमाणेच एके काळी सोमालियालॅन्डलाही टोळ्यांमधील कलहांनी तसेच प्रादेशिक संघर्षांनी ग्रासलेले. मात्र, १९९३ साली सोमालियालॅन्डमधील सर्व वांशिक टोळ्या एकत्र बसल्या. पारंपरिक आणि आधुनिक असे दोन्ही प्रवाह सामंजस्याने जमले. आपल्यातील ज्येष्ठांमधून त्यांनी शासनसंस्थेसारखी व्यवस्था परस्पर सामोपचाराने निर्माण केली आणि आज दोन तपे सोमालियालॅन्ड स्थैर्य आणि त्यांतून निपजणारा आर्थिक विकास यांची गोड फळे चाखत आहे.

खनिज तेलांच्या साठ्यांनी समृद्ध असा जगातील एक देश अशी नायजेरियाची ख्याती. कच्च्या खनिज तेलाचे बाजारभाव आंतरराष्ट्रीय बाजारात सतत चढते राहिल्याने भाग्य फळफळलेल्या नायजेरियाने सतत दहा वर्षे सुबत्ता पुरेपूर उपभोगली...आणि त्याच नायजेरियावर आता विकासासाठी अर्थसाह्य पदरात पाडून घेण्यासाठी हात पसरण्याची वेळ ओढवलेली आहे.



तेलाचा भरभक्कम पैसा मिळत असताना त्यांतील किती हिस्सा भविष्यकालीन गुंतवणुकीसाठी बचतीच्या रूपाने राखला गेला याचा पत्ता तिथे कोणालाच नाही. कमावलेली सुबत्ता भ्रष्टाचाराच्या रूपाने गिळंकृत केली गेली, अशीच बहुसंख्य नायजेरियावासियांची धारणा आहे. तेलासारख्या नैसर्गिक सामग्रीपासून हस्तगत होणा-या समृद्धीचे सुयोग्य संवर्धन करण्यासाठी आवश्यक असणारी संस्थात्मक प्रणाली विकसित करण्यात आलेले अपयश हे नायजेरियाच्या आजच्या दुरवस्थेचे कारण. निसर्गदत्त ठेव्यापासून मिळणा-या लाभांचा दक्षपणे विनियोग करण्याबाबत दिरंगाई दाखवल्याने तो ठेवा उधळून झाल्यानंतर घसरलेला आर्थिक विकास आणि ओहोटीला लागलेली सुबत्ता यांचा अनुभव निसर्गसंपत्तीने युक्त असणा-या अनेक देशांनी घेतल्याची उदाहरणे आहेत. सुयोग्य अशी वित्तीय आणि आर्थिक धोरणे राबवली असती तर नायजेरियावर अशी वेळ आली नसती.

साधारणपणे १९७०च्या दशकातील अखेरच्या पर्वापासून पुढे सलग तीन दशके अत्यंत दमदार वेगाने आर्थिक प्रगती साध्य करून सगळ्या जगाचा कौतुकाचा आणि असुयेचा विषय बनलेल्या चीनमधील संस्थात्मक संरचना या सगळ्या काळात गुणात्मकरीत्या अणुमात्रही बदललेली नाही, असे अनेक अभ्यासकांचे निरीक्षण व अभ्यास सांगतो. अर्थव्यवस्थेतील संस्थात्मक संरचनेचा आणि नेत्रदीपक आर्थिक आगेकूचीचा काहीही संबंध नसतो, असा अर्थ जर कोणी यांतून काढायला लागले तर ती मोठीच चूक ठरेल. आज, जवळपास तीन दशकी भरधाव दौडीनंतर चिनी अर्थव्यवस्था अडखळायला लागलेली आपण सगळेच पाहतो आहोत. आर्थिक विकासाचा आवेग गतिमान राखण्यासाठी बाजारपेठीय स्पर्धा, नवनवीन उद्योगांना अर्थकारणाच्या विविध क्षेत्रांत सहज जा-ये करण्याचे स्वातंत्र्य, नवसर्जनाचे धुमारे कोमेजू नयेत यासाठी अनुकूल व्यावसायिक पर्यावरण... अशांसारख्या पावलांना बळ देणा-या राजकीय इच्छाशक्तीची निकड असते. आता, हे करायचे तर अर्थकारणात तसेच अर्थव्यवस्थेत बळजोर बनलेल्या हितसंबंधी गटांचे मुजोर लागेबांधे तोडावे लागतात. प्रस्थापित हितसंबंधियांचे जाळे अशा बदलांना साहजिकच कडवा विरोध करते. त्यांतूनच, पुढील टप्प्यावरील आर्थिक सुधारणांचा गाडा रखडायला सुरुवात होते.

गुंतवणूकदार, विकासक, नियोजनकार, नागरिक, राजकीय क्षेत्रातील धुरीण आणि प्रशासक यांच्यातील सौहार्दपूर्ण संवादाद्वारे साकारणारे आणि नियोजन व गुंतवणूक यांचे परस्परपूरक साहचर्य जपण्यातून फुलणारे नागरीकरण, 'विकासाचे इंजिन' समजल्या जाणा-या शहरांच्या मालिकेला जन्म देत असते. सक्षम आर्थिक विकास, उत्पादकता आणि सर्जनशीलता यांची माहेरघरे असे त्या शहरांचे मग रूप बनते. गुंतवणुकीवर आकर्षक परताव्याची अपेक्षा धरणारे खासगी गुंतवणूकदार, ग्राहकांपर्यंत सुलभतेने पोहोचविणारी सुगमता हवी असणारे उद्योजक, उत्पादक व पुरवठादार, रोजगार आणि नागरी पायाभूत सेवासुविधांच्या अपेक्षेत असणारे नागरिक...अशा निरनिराळ्या शहरवासियांच्या अपेक्षांची पूर्तता करणारे नियोजन मग शहररचनाकार सुचवू शकतात. अशा लोकाभिमुख नियोजनाची व्यवहारात अंमलबजावणी घडून यावी यासाठी मग गुंतवणुकीचीदेखील वानवा जाणवत नाही. परंतु, खेदाची बाब अशी की, अनेक शहरे नेमकी याच आघाडीवर तोकडी पडतात. भारतातील नागरीकरण हे या वास्तवाचा जणू रोकडा नमुनाच. शहरोशहरी फोफावलेल्या आणि आजही वाढत असलेल्या झोपडपट्ट्या म्हणजे, विविध सामाजिक-आर्थिक स्तरांतील शहरवासियांच्या अपेक्षांशी विसंगतपणे होत राहिलेल्या शहरी सार्वजनिक गुंतवणुकीचा आणि शहरांतर्गत जमिनींच्या दिशाहीन वापराचा जळजळीत वस्तुपाठच जणू. परिणामी, परवडण्याजोग्या निवासी घरांचा तुटवडा, रास्त व वाजवी दराने उपलब्ध होणा-या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अभाव, माणसे आणि वापर यांच्या अतिरिक्त भाराखाली पिचलेल्या नागरी पायाभूत सेवासुविधा यांपायी अक्षरशः मेटाकुटीला आलेले निम्न सामाजिक-आर्थिक स्तरांतील नागरिक शहरांच्या कडेवर फेकले जातात. शहरांमध्ये फोफावलेल्या असंघटित व्यापारउद्योगांच्या क्षेत्रावर, खरे पाहता, या समाजसमूहांची रोजीरोटी अवलंबून असते. त्यांमुळे, वास्तवात, त्यांना शहरांमध्ये स्थान मिळणे आवश्यक असते आणि इष्टही. त्यांमुळे, एकीकडे त्यांच्या कल्याणाची हानी होत राहते आणि दुसरीकडे अशा सगळ्या अव्यवस्थेपायी शहरेही त्यांच्या वाढविकासाची, उत्पादकतेची साधता येण्याजोगी पर्याप्त पातळी गाठू शकत नाहीत.



जागतिक फुटबॉल स्पर्धा अगदी तोंडावर येऊन ठेपल्यानंतर, वाहतूक, सार्वजनिक शिक्षण, आरोग्य यांसारख्या नागरी पायाभूत सेवांच्या असमाधानकारक दर्जाबाबत तीव्र दाटलेला असंतोष प्रगटपणे व्यक्त करणा-या हजारो नागरिकांच्या उग्र मोर्च्यांनी ब्राझीलमधील रस्ते नुसते फुलून गेल्याचे दृश्य सा-या जगाने २०१३ साली बघितले. खरे म्हणजे, सलग १२ वर्षे सुदृढ अशा आर्थिक विकासाचे लाभ ब्राझीलला मिळालेले होते. सुमारे तीन कोटी ब्राझीलवासी गरिबीच्या खाईतून त्या सुबत्तेदरम्यान बाहेर आले होते. संख्येने चांगला मोठा असणारा एक सजग मध्यमवर्ग तिथे निर्माण झालेला होता. करभरणा करून याच मध्यमवर्गाने सरकारी तिजोरीला पुरविलेल्या टेकूमुळे पायाभूत सेवासुविधांचा पुरवठा करणे सरकारला शक्य बनलेले होते. आणि तोच मध्यमवर्ग २०१३ साली अधिक दर्जेदार नागरी सुविधांच्या पुरवठ्यासाठी नारेबाजी करत ब्राझीलमधील रस्त्यांवर उतरलेला होता. ब्राझीलमधील समाजामध्ये असलेली सामाजिक बांधिलकी व कराराची जाणीव पूर्वापार विकल राहिल्याचे ते निदर्शक होते. ब्राझीलमधील गोरगरिबांना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बळ स्तरांतील समाजघटकांना निकृष्ट दर्जाच्या सार्वजनिक सेवांवरच गुजराण करावी लागत असे. तर, आर्थिकदृष्ट्या संपन्न स्तरांतील समाजघटक बाजारपेठेत रोख दाममोल मोजून खासगी पुरवठादारांकडून दर्जेदार सेवा पदरात पाडून घेत आलेले होते. साहजिकच, सार्वजनिक तिजोरीला आणि सार्वजनिक राजकोषीय व्यवस्थेला योगदान देण्यामध्ये त्यांना काडीचेही स्वारस्य नव्हते.

वास्तविक पाहता, मधल्या १२ वर्षांच्या आर्थिक भरभराटीदरम्यान गरिबीच्या कचाट्यातून सुटलेलेच अनेक समाजसमूह निम्न मध्यमवर्गाचे घटक बनलेले होते. म्हणजे, मध्यमवर्गाचा झालेला संख्यात्मक विस्तार आणि दारिद्र्यरेषेखालील लोकसंख्येच्या प्रमाणात ब्राझीलमध्ये घडून आलेली घट हे दोन्ही एकाच प्रक्रियेचे वा घटिताचे पैलू होते. मात्र, संख्यात्मक विस्तार घडून आलेल्या मध्यमवर्गाच्या अपेक्षांचा स्तर एकाएकी भरगच्च उंचावल्यामुळे, पायाभूत सार्वजनिक सुविधांच्या दर्जासंदर्भातील मागणीचा स्तर अवास्तव वाढून, कररूपाने ते देत असलेल्या वित्तीय योगदानाच्यापेक्षा शासनसंस्थेकडून अधिक परताव्याची अपेक्षा लोकमानसात बळावली.

युरोपीय समुदायाला रामराम ठोकण्याचा मानस ब्रिटिश नागरिकांनी २०१६ सालातील जून महिन्यात सार्वमताद्वारे व्यक्त केला. या निर्णयामुळे एक देश म्हणून ब्रिटनच्या पुढ्यात आणि पर्यायाने उभ्या युरोपच्या पुढ्यात जे आर्थिक भागधेय दत्त म्हणून उभे आहे त्यांबद्दल धोरणविश्वात एक प्रकारची अस्थिरता गुंजते आहे. राजकीय अथवा आर्थिक एकत्रीकरणाबाबत नापसंती अथवा नकारात्मक भावना ही केवळ ब्रिटनमध्येच काय ती नांदत राहिली, असा निष्कर्ष त्यांवरून काढणे अनाठायी ठरेल. एकंदरीनेच, राजकीय वा आर्थिक सामिलीकरणाबाबत अनेक देशांतील काही राजकीय शक्ती विरोधी सूर लावत लोकमत आपल्या बाजूने संघटित करत असल्याचे अनुभव आपण रोज घेत आहोत. व्यापक स्तरावरील सामाजिक अथवा राजकीय चर्चाविश्वातून आपल्याला वगळले जात असल्याची भावना काही लोकसमूहांमध्ये चेतवून अथवा, एखाद्या देशातील एखाद्या विविक्षित लोकसमूहाचे अवाजवी लाड अथवा लांगूलचालन केले जात असल्याबद्दल सर्वसामान्यांच्या मनोविश्वात रोष उत्पन्न करून त्या धगीवर फुटीरतावादी राजकीय शक्ती आपली पोळी भाजून घेत राहतात. एकत्रीकरणामुळे ज्या अर्थव्यवस्थांना सुबत्तेचा लाभ झालेला आहे अशा अर्थव्यवस्थांमधील तुलनेने वंचित व अभावग्रस्तही प्रसंगी सामिलीकरणाबाबत निषेधाचा विरोधी सूर लावत असतात. अशा असंतुष्टांना बळ पुरविणाऱ्या शक्ती पर्यायाने समाजाच्या एकात्मतेला तडे देण्याचेच काम मनोभावे करत असतात.

या सगळ्यांत एकच एक समान सूत्र दिसते. जवळपास सगळेच देश सर्वसाधारणपणे एकाच प्रकारची विकासविषयक उद्दिष्टे मनाशी बाळगून धोरणांची आखणी व अंमलबजावणी करत असतात. समाजव्यवस्थेला संघर्षाची, हिंसाचाराची झळ पोहोचू नये, समाजाच्या विविध स्तरांतील जनसमूहांना आर्थिक सुबत्तेचा लाभ व्हावा, अर्थव्यवस्थेत निर्माण झालेली सुबत्ता विविध स्तरांत शक्यतो समप्रमाणात झिरपावी. सुदृढपणे वाटचाल करणारी आर्थिक विकासाची प्रक्रिया पर्यावरणीयदृष्ट्याही सातत्यशील ठरावी...हाच उद्दिष्टांचा संच बहुतेक ठिकाणी सर्वसाधारणपणे दिसतो. असे असूनही, ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आखली जाणारी धोरणे त्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यात अपयशी का ठरतात, हा प्रश्न उरतोच.



धोरणे व्यवहारात का फसतात अथवा अयशस्वी वा अपुरी ठरतात, हे खरोखरच जटिल कोडे होय. सोमालिया हा अत्यंत संवेदनशील आणि म्हणूनच नाजूक स्थितीत असलेला देश दिसतो. तर, त्याच सोमालियातील सोमालियालॅन्ड हा स्वायत्त प्रदेश बऱ्यापैकी स्थिर व प्रगत आहे. खनिज तेलासारखा समृद्ध निसर्गदत्त ठेवा मुबलक प्रमाणात लाभूनही नायजेरिया आजही निम्नमध्यम उत्पन्नगटातील देश गणला जातो. अर्थकारणातील काही कळीच्या व मूलभूत संस्थांमध्ये अनुरूप असे परिवर्तन घडवून न आणताही चीनसारखा देश प्रदीर्घ काळ नेत्रदीपक आर्थिक आगेकूच साध्य करू शकतो. भारतासारखा देशही भरधाव आर्थिक प्रगती करतो आहे. नागरीकरणाचा तिथे वेगही दमदार आहे. तरीही, नगरा-महानगरांमधील झोपडपट्ट्यांच्या विस्ताराला आळा घालणे त्याला अजूनतरी जमलेले नाही. बऱ्यापैकी सर्वसमावेशक आर्थिक प्रगती साध्य केलेल्या ब्राझीललाही असंतुष्ट, असमाधानी मध्यमवर्गाच्या प्रगट व उग्र रोषाचा सामना करावा लागतोच आहे. युरोपीय समुदायातील अन्य देशांच्या तुलनेत ब्रिटनमध्ये बेरोजगारीचे सरासरी प्रमाण बरेच कमी होते. तरीही, युरोपीय समुदायातून बाहेर पडण्याचा कौल ब्रिटिश नागरिकांनी दिलाच. एक प्रकारे, सुशासन कमी पडत असल्याचेच हे सारे दाखले होत. परिणामकारक नसलेली, प्रभावहीन धोरणे आखली व राबविली जात राहतात. उचित, नेमकी, समस्येवर थेट व कालबद्ध उपाय शोधणारी वा सुचविणारी धोरणे अंगीकारली जात नाहीत. मग, धोरणांची प्रभावक्षमता नेमकी अवलंबून असते तरी कशावर, या प्रश्नाचा पाठपुरावा जगभरातील शासक आणि धोरणकर्ते आजघडीला नेटाने करताना दिसतात.

व्यवहारात अनेक नमुने दिसतात. सर्वोत्तम गणली जाणारी धोरणे व्यवहारात सपशेल फसतात. अनेकदा, राबविलेल्या धोरणांद्वारे अपेक्षित असणाऱ्या लाभांच्या जोडीनेच काही अनपेक्षित परिणामही साकारतात. ते सकारात्मक असतात तसेच नकारात्मकही. मग, अवांछित परिणामांची नाकेबंदी करण्यासाठी पुन्हा धोरणकर्त्यांची धावपळ चालू होते. अखेर, धोरणांची आखणी व अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची बांधिलकी, सुसूत्र कार्यप्रणाली आणि परस्परसहकार्य या तीन बाबी कळीच्या ठरतात. ●●

सामाजिक

# भारतातील बिगर शेती रोजगाराचे चित्र

सामाजिक-आर्थिक समस्या व घटितांच्या अध्ययन-संशोधनासाठी अनेक प्रकारची आकडेवारी आपल्या देशात निरनिराळ्या संस्थांच्या माध्यमातून संकलित केली जात असते. या संस्था ज्या प्रमाणे सरकारी असतात त्याचप्रमाणे स्वयंसेवी तसेच खासगी संस्थांच्या माध्यमातूनही अनंत प्रकारची सांख्यिकी गोळा केली जात असते. या आकडेवारीचे विश्लेषण करून त्यांद्वारे पुढ्यात उभरणा-या सामाजिक व आर्थिक वास्तवाचे चौफेर परीक्षण करत उचित अशी धोरणात्मक उपाययोजना व्हावी, अशी अपेक्षा असते. अर्थात, ही अपेक्षा दरवेळी पूर्ण होतेच असे नाही. अनेक प्रकारची बहुमोल सांख्यिकी अनेकदा अ-लक्षित राहिल्याची अनेक उदाहरणे सांगता येतील. आपल्या देशात वेळोवेळी आयोजित केल्या जाणा-या आर्थिक गणनेचे (इकॉनॉमिक सेन्सस्) उदाहरण या संदर्भात ताबडतोब डोळ्यासमोर येते.

पार १९व्या शतकाच्या अखेरच्या पर्वापासून आपल्या देशात दर १० वर्षांनी नियमितपणे आयोजित केली जाणारी जनगणना हा एक आश्चर्यकारक म्हणावा असाच उपक्रम. त्यांमुळे, आर्थिक-सामाजिक क्षेत्रातील संशोधन-अध्ययन-अध्यापन या कशाशीही संबंध नसलेल्या सर्वसामान्य नागरिकांनादेखील लोकसंख्येच्या गणतीबाबत ऐकीव का होईना पण, माहिती असतेच. त्या मानाने आर्थिक गणना अत्यल्प परिचित ठरते. आर्थिक तसेच सामाजिक संशोधनाच्या क्षेत्रातील मोजके अपवाद वगळले तर अन्य कोणीही आर्थिक गणनेद्वारे हाती येणा-या माहितीच्या खजिन्याकडे वळताना दिसत नाहीत. केंद्र सरकारच्या अखत्यारीतील सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयांतर्गत येणारी ‘सेन्ट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशन’ (सीएस्‌ओ) या विख्यात व्यवस्थेच्या माध्यमातून ही आर्थिक गणना कार्यान्वित केली जाते. राज्याराज्यांतील अर्थ व सांख्यिकी संचालनालयांच्या सहकार्याने ही गणना ‘सीएस्‌ओ’ तडीस नेत असते.



आर्थिक गणनेची अगदी अलीकडील सहावी फेरी जानेवारी २०१३ ते एप्रिल २०१४ या कालावधीमध्ये संपन्न झाली. आर्थिक गणनेच्या या आधीच्या पाच फे-या अनुक्रमे १९७७, १९८०, १९९०, १९९८ आणि २००५ या वर्षी आयोजित करण्यात आलेल्या होत्या. २०१३ साली आयोजित करण्यात आलेल्या सहाव्या फेरीदरम्यान संकलित करण्यात आलेली आकडेवारी आता उपलब्ध झालेली आहे. धान्योत्पादन आणि मळे वा बगीचे यांसारखे उद्योग वा व्यवसाय वगळता सर्व प्रकारच्या उत्पादक उपक्रमांचा समावेश या गणनेमध्ये केलेला असतो. उद्योगव्यवसायांचा प्रकार, उत्पादने, स्थानांकन, उलाढाल, मालकी तत्त्वाचा प्रकार, रोजंदारी मिळालेल्या कामगारांची संख्या... अशा अनेकानेक बाबींसंदर्भातील माहितीचे संकलन आर्थिक गणनेमध्ये केलेले असते. शासनाच्या प्रशासन, संरक्षण आणि सामाजिक सुरक्षांशी संबंधित उपक्रमांमधील रोजगाराचा अंतर्भाव २०१३ साली आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनेच्या सहाव्या फेरीत करण्यात आलेला नव्हता. एक तर, या संदर्भातील आकडेवारी शासनाच्या संबंधित विभागांकडे उपलब्ध होत राहते. आणि दुसरे म्हणजे, या घटकांकडून आर्थिक गणनेच्या पाचव्या फेरीदरम्यान आकडेवारी गोळा करताना आलेल्या अडचणी ध्यानात घेऊन आर्थिक गणनेच्या सहाव्या फेरीत त्यांचा अंतर्भाव करण्यात आला नाही. भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या एक संलग्न संशोधिका डॉ. शरदिनी रथ यांनी १९९८ आणि २०१३ या दोन वर्षी आयोजित करण्यात आलेल्या आर्थिक गणनेच्या अनुक्रमे चौथ्या व सहाव्या फेरीदरम्यान भारतीय अर्थव्यवस्थेतील बिगर शेती उद्योगांसंदर्भात गोळा करण्यात आलेल्या आकडेवारीचा तौलनिक अभ्यास करून त्यांद्वारे पुढ्यात उतरणारे चित्र जाणून घेण्याचा प्रयत्न अलीकडेच केला. डॉ. रथ यांचे त्या संदर्भातील काम अजूनही चालूच आहे. मात्र, १९९८ आणि २०१३ या १५ वर्षांदरम्यान आपल्या देशातील बिगर शेती उद्योगव्यवसाय घटक आणि त्यांतील रोजगार यांत घडून आलेल्या बदलांचे अगदी प्राथमिक विश्लेषण जे वास्तव पुढ्यात मांडते ते विलक्षण चिंतनीय आणि तितकेच चिंताजनक आहे, हे निश्चित. रोजगारनिर्मितीसंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढ्यात उभ्या असलेल्या आव्हानाचे विविध पैलू त्यांद्वारे स्पष्ट होतात.

**वस्तुनिर्माण उद्योगातील तुटपुंजी रोजगारवाढ**

भारतीय अर्थव्यवस्थेतील बिगर शेती रोजगाराच्या संख्येमध्ये १९९८ ते २०१३ या दीड दशकाच्या कालावधीदरम्यान जवळपास ७१ टक्क्यांची वाढ घडून आली. १९९८ साली घेण्यात आलेल्या आर्थिक गणनेनुसार देशातील बिगर शेती उद्योगव्यवसायांत एकंदर ७ कोटी ६८ लाख ६० हजार १५४ लोकांना रोजगार मिळालेला होता. २०१३ सालातील आर्थिक गणनेनुसार हाच आकडा पोहोचलेला दिसतो १३ कोटी १२ लाख ९३ हजार ८६८ वर. अर्थकारणातील कोणकोणत्या उद्योगव्यवसाय क्षेत्रांतील रोजगारात या १५ वर्षांच्या दरम्यान लक्षणीय वाढ घडून आली, याचा अभ्यास या ठिकाणी अधिकच रोचक ठरतो. या वाढीची टक्केवारी उतरत्या क्रमाने लावली तर सर्वांत पहिल्या स्थानावर येते ते प्राथमिक क्षेत्र. इथे शेतीचा विचार केलेला नाही. परंतु, पशुपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, मासेमारी, वनशेती अथवा वनजन्य/वनसंलग्न व्यवसाय यांसारख्या जमिनीशी संबंधित उद्योगधंद्यांचा या व्यवसायक्षेत्रात विचार केलेला आहे. १९९८ ते २०१३ या दीड दशकादरम्यान या प्राथमिक क्षेत्रातील बिगर शेती रोजगारात तब्बल २३९ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वेगाने हातपाय पसरत असलेले नागरीकरण, आर्थिक पुनर्रचनापर्वादरम्यान दरडोई सरासरी उत्पन्नाच्या पातळीत घडून आलेली वाढ, ब-याच मोठ्या नागरी लोकसंख्येच्या आहारविषयक बाबींमध्ये घडून येत असलेला गुणात्मक बदल या सगळ्या स्थित्यंतराच्या चौकटीत या रोजगारवाढीचा अन्वय नीट समजावून घ्यायला हवा.

उतरत्या भाजणीमध्ये दुस-या स्थानावर आहे ते बांधकाम क्षेत्र. १९९८ आणि २०१३ या दोन कालबिंदूंदरम्यान बांधकाम क्षेत्रातील रोजगारात २०० टक्क्यांनी वाढ घडून आल्याचे आर्थिक गणना दाखवते. नागरीकरणाचा विस्तार, रस्ते व महामार्गांसारख्या पायाभूत सेवासुविधांच्या विकासावर असणारा सरकारचा भर आणि मुख्यतः माहिती-तंत्रज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवाउद्योगाच्या वाढत्या पसा-यापायी निवासी घरे आणि व्यावसायिक गाळ्यांना उदारीकरणोत्तर कालखंडात वाढलेली मागणी यांचा पार्श्वपट या वाढीला लाभलेला आहे, हे नजरेआड करता येत नाही.



या सूचीमध्ये तिस-या स्थानावर क्षेत्र आहे ते वित्तीय सेवा आणि जमीनजुमल्याशी संबंधित (रिअल इस्टेट) उद्योगांचे. १९९८ आणि २०१३ या दोन टोकांदरम्यान या व्यवसायांतील रोजगारात १२७ टक्क्यांनी वाढ झाली. रोजगारात १२१ टक्क्यांची वाढ नोंदवत चौथ्या स्थानावर दिसते ते वाहतूक, साठवणूक व दळणवळण उद्योगव्यवसायांचे क्षेत्र. तर, वीज-पाणी-नैसर्गिक वायू यांच्याशी संबंधित धंदेव्यवसायांमधील रोजगारात १९९८ ते २०१३ या १५ वर्षांदरम्यान वाढ घडून आली ती ११९ टक्क्यांची. ज्या उद्योगव्यवसायांच्या प्रांगणात ही रोजगारवाढ घडून आली ती व्यवसायक्षेत्रे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. रोजगारवाढीच्या संदर्भात पहिली पाच मानांकने लाभलेले हे सगळे धंदेव्यवसाय आर्थिक पुनर्रचना पर्वाचा थेट लाभ झालेले आहेत. परंतु, या सगळ्यांत सर्वाधिक लक्षवेधक बाब म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेतील वस्तुनिर्माण उद्योगांतील रोजगारांत मात्र १९९८ ते २०१३ या संपूर्ण काळात वाढ घडून आली ती अवघी २४.४७ टक्क्यांची ! हे वास्तव खरोखरच मननीय ठरते. भारतीय अर्थव्यवस्थेला लाभलेल्या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'ची चर्चा सदासर्वकाळ सर्वत्र चालू असते. या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा पुरेपूर लाभ उठवायचा तर, अर्थव्यवस्थेमध्ये चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरेशा प्रमाणात निर्माण होण्याच्या दृष्टीने वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्रातील रोजगारात वाढ घडून येणे अगत्याचे ठरते. असे असताना, वस्तुनिर्माण उद्योगक्षेत्रातील रोजगारात दीड दशकादरम्यान जेमतेम २५ टक्क्यांची तुटपुंजी वाढ घडून यावी, हे वास्तव विलक्षण बोलके आणि तितकेच बोचरेही ठरते.

भारतीय अर्थव्यवस्थेतील बिगर शेती रोजगारात १५ वर्षांच्या कालावधीत केवळ ७० टक्क्यांची वाढ घडून यावी, ही काही फार स्पृहणीय बाब म्हणता येत नाही. एक वेळ यांबाबत समाधान मानले तरी या रोजगारवाढीचा आणखी दुसरा जो संलग्न पैलू आहे तो अधिकच चिंतनीय ठरतो. कामगारांच्या संख्येनुसार उद्योगधंद्यांच्या केलेल्या वर्गीकरणात देशातील एकंदर बिगर शेती रोजगार कसा विभागलेला आहे आणि कामगारसंख्येनुसार रचलेल्या उतरंडीतील नेमक्या कोणत्या आकारमानाच्या उद्योगधंद्यांमधील रोजगारात वाढ घडून आली हेही अभ्यासणे या संदर्भात आवश्यक ठरते.

**बव्हंश रोजगारवाढ उतरंडीच्या तळाशीच**

रोजगारवाढीचा हा पैलू तर अधिकच रोचक ठरतो. त्याला कारणही तसेच आहे. १९९८ सालातील आर्थिक गणनेच्या आकडेवारीनुसार, देशपातळीवरील बिगर शेती उद्योगधंद्यांचा विचार केला तर, ज्या उद्योगव्यवसाय घटकांमध्ये १०पर्यंत कामगार आहेत अशा उद्योगधंद्यांमध्ये रोजीरोटी मिळालेल्या कामगारांचे बिगर शेती उद्योगांतील एकंदर कामगारांमधील प्रमाण ७६ टक्क्यांइतके प्रचंड होते. म्हणजे, दर उद्योगामागील कामगारांच्या संख्येनुसार देशाच्या अर्थव्यवस्थेतील बिगर शेती उद्योगव्यवसायांचे वर्गीकरण केले तर, या उतरंडीच्या अगदी तळाशी असणा-या उद्योगव्यवसाय घटकांतच बिगर शेती उद्योगांच्या क्षेत्रातील रोजगाराचे केंद्रीकरण झालेले दिसते. २०१३ सालातील आर्थिक गणनेची आकडेवारी अभ्यासली तर दिसणारे चित्र मनोज्ञ आहे. १० कामगारांपर्यंतच ज्या बिगर शेती उद्योगव्यवसाय घटकांमधील एकंदर कामगार संख्या आहे अशा उद्योगांत २०१३ साली एकूणांतील ८२ टक्के बिगर शेती कामगार एकवटलेले होते. म्हणजेच, १० पेक्षा कमी कामगार संख्या असलेल्या बिगर शेती उद्योगव्यवसाय घटकांतील कामगारांच्या एकूण कामगारांमध्ये असलेल्या प्रमाणात १९९८ ते २०१३ या दीड दशकादरम्यान सहा पर्सेन्टेज पॉइंटनी वाढ झालेली होती. याचा दुसरा अर्थ असा होतो की, भारतीय अर्थव्यवस्थेतील बिगर शेती उद्योगव्यवसाय घटकांतील रोजगारांत जी वाढ घडून आलेली आहे ती बहुतांश आकारमानाने अगदी लहान (कामगार संख्या १०पेक्षा कमी असलेल्या) असलेल्या उद्योगधंद्यांतच घडून आलेली आहे. हाच कल १९९८ ते २०१३ या १५ वर्षांदरम्यान बदलला तर नाहीच उलट तो अधिक सुदृढ बनल्याचे आर्थिक गणनेची आकडेवारी सांगते.

या संदर्भातील आणखी एका पैलूची नोंद या ठिकाणी करून ठेवणे आवश्यक ठरते. तो पैलू असा की, बिगर शेती उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील पशुपालन, मासेमारी, खाणउद्योग, वस्तुनिर्माण, बांधकाम, व्यापार, हॉटेलिंग, वाहतूक, शिक्षण, आरोग्य अशा सगळ्यांच उपक्षेत्रांत १९९८ ते २०१३ या दीड दशकांदरम्यान हाच कल आढळून येतो. या कलाची ही सार्वत्रिकता धोरणनिर्मितीच्या संदर्भात फार कळीची ठरते.



बिगर शेती उद्योगधंद्यांच्या क्षेत्रातील पशुपालन, मासेमारी, पोल्ट्री, व्यापार, हॉटेल, आरोग्य, शिक्षण, बांधकाम, वाहतूक, साठवणूक, दळणवळण, वस्तुनिर्माण यांसारख्या उपक्षेत्रांत, आकारमानाने लहान असणा-या उद्योगांत त्या त्या उपक्षेत्रातील एकंदर रोजगारापैकी भरभक्कम हिस्सा एकवटलेला असण्याची प्रवृत्ती अथवा कल १९९८ सालातील आर्थिक गणनेच्या माध्यमातून पुढ्यात उमटलेला होता. १०पेक्षा कमी कामगार संख्या असणा-या उद्योगव्यवसाय घटकांत त्या त्या उपक्षेत्रातील बव्हंश रोजगार एकवटण्याचा तो कल या उपक्षेत्रांच्याबाबतीत २०१३ सालीही दृग्गोचर व्हावा, हे एकापरीने स्वाभाविक म्हणता येईल. परंतु, बिगर शेती उद्योगव्यवसायांच्या क्षेत्रातील ज्या उपक्षेत्रांत त्या त्या उपक्षेत्रातील लहान आकारमानाच्या उद्योगव्यवसायांमध्ये एकूणांतील रोजगाराचे केंद्रीकरण १९९८ साली नेमस्त होते त्यांतही २०१३ सालापर्यंत लक्षणीय वाढ घडून यावी, हे वास्तव मात्र गांभीर्याने दखल घ्यावी असेच म्हणावे लागते.

खाणउद्योग, वीज-पाणी-वायू यांच्याशी निगडित उद्योग आणि वित्त व ‘रिअल इस्टेट’ या तीन उपक्षेत्रांचा निर्देश या संदर्भात आवर्जून करावा लागेल. बिगर शेती उद्योगघटकांच्या या उपक्षेत्रांत, कामगारांची संख्या १०पेक्षा कमी असलेल्या व्यवसायघटकांतील कामगारांचे त्या त्या उपक्षेत्रातील एकंदर कामगारांमध्ये भरणारे प्रमाण १९९८ साली अनुक्रमे २१ टक्के, १८.४९ टक्के आणि ५४.५८ टक्के इतके होते. २०१३ सालासाठीची आकडेवारी अभ्यासली तर हेच प्रमाण अनुक्रमे ४० टक्के, ५० टक्के आणि ७४ टक्के इथपर्यंत वाढलेले दिसते. म्हणजेच, १० कामगारांपेक्षा कमी कामगार संख्या असणा-या उद्योगव्यवसाय घटकांत रोजगाराचे केंद्रीकरण घडून येण्याच्याबाबतीत दीड दशकापूर्वी बिगर शेती उद्योगव्यवसायांची जी उपक्षेत्रे तुलनेने पिछाडीवर होती त्या उपक्षेत्रांतही आता रोजगारनिर्मितीचे केंद्रीकरण तुलनेने लहान आकारमानाच्या उद्योगव्यवसायघटकांमध्येच घडून येण्याची प्रवृत्ती अलीकडील काळात बलवत्तर बनलेली आहे. बिगर शेती क्षेत्रांत दर्जेदार रोजगार पुरेशा प्रमाणात निर्माण करण्याची गरज व आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढ्यात उभे असताना वास्तवात हे चित्र पुढ्यात यावे, याचा अर्थ काय लावायचा ? ●●

जिकडे-तिकडे

# ‘ड्रोन’च्या रूपातील हवाई आरोग्यदूत

आफ्रिका खंडातील रवांडा देश. रवांडाच्या सुदूर दुर्गम भागात वसलेल्या एका खेड्यातील आरोग्यकेंद्राकडून रवांडाच्या राजधानीत असलेल्या एका कार्यालयात फोन येतो. बाळंतपणादरम्यान अतिरिक्त रक्तस्त्राव झाल्याने जीव धोक्यात आलेल्या एका मातेला अमुक प्रकारच्या रक्ताची नितांत आवश्यकता आहे...लौकरात लौकर रक्त पाठवून द्या...अवघ्या काही तासांतच त्या आरोग्यकेंद्राच्या परिसरात एका छोटेखानी विमानाची घरघर ऐकू येऊलागते. इस्पितळाच्या माथ्यावर दोनएक घिरट्या घालणा-या त्या विमानातून एक छोटेखानी पाकिट पॅराशुटच्या साहाय्याने खाली येते आणि इस्पितळाच्या अंगणात धप्पदिशी पडते. त्याच वेळी तिकडे, त्या आरोग्यकेंद्रात त्या वेळी कामावर असलेल्या परिचारिकेच्या मोबाइल फोनवर निरोप येतो... “तुम्हांला गरज असलेल्या रक्ताच्या बाटलीची डिलिव्हरी इस्पितळाच्या अंगणात झालेली आहे, कृपा करून ते पाकिट लगेचच ताब्यात घ्या...”

विश्वास बसत नाही ना हे सगळे वाचून वा ऐकून. पण ते १०० टक्के सत्यच आहे. त्या इस्पितळाच्या अंगणात रक्ताच्या बाटलीची ‘डिलिव्हरी’ करणारे ते विमान म्हणजे वास्तवात एक ‘ड्रोन’ आहे. रक्तासारख्या जीवदायक जिनसाची दुर्गम भागांत त्वरेने पाठवणी अथवा ‘डिलिव्हरी’ करणारे, खास त्याचसाठी तयार केलेले विमान म्हणजे ‘ड्रोन’. आपल्या शरीराचे चलनवलन कार्यक्षमपणे चालायचे असेल तर शरीराच्या विविध अवयवांना आणि शरीरांतर्गत अनेकविध व्यवस्थांना रक्ताचा पुरवठा सुरळीत आणि नियमित व्हायला हवे. शरीरातील पेशींचे, रक्तवाहिन्यांचे जाळे ते काम बिनतक्रार २४ तास करत असते. त्याच धर्तीवर देशाच्या कानाकोप-यांत, दुर्गम, डोंगराळ भागांत, दळणवळणासाठी रस्ते वगैरे सुविधा नसलेल्या प्रदेशांत वसलेल्या रुग्णालयांना रक्ताचा हुकूमी पुरवठा करणारे असे ड्रोन्स आता रवांडात कार्यरत बनलेले आहेत.



हे सारे तंत्रज्ञान आणि ही यंत्रणा विकसित केलेली आहे ती ‘झिप्लाइन’ या तंत्रविकासक संस्थेने वा कंपनीने. ‘झिप्लाइन’ ही आहे एक ‘स्टार्टअप’ कंपनी. रवांडा सरकारच्यावतीने त्या देशाच्या दूरदूर पसरलेल्या खेड्यांमध्ये चालविल्या जाणा-या इस्पितळांना रक्ताचा तसेच अन्य काही वैद्यकीय मदतीचा वा जिनसांचा, साधनसामग्रीचा पुरवठा थोडक्या वेळेत करण्यासाठी ‘ड्रोन’च्या रूपातील हे हवाई आरोग्यदूत निर्माण केले ‘झिप्लाइन’ या कंपनीने. २०१६ सालातील ऑक्टोबर महिन्यापासून ही सेवा रवांडामध्ये सुरूझाली. गंमत म्हणजे, ‘ड्रोन’चे असे तंत्रज्ञान वापरून पिझ्झ्यासारखे खाद्यपदार्थ अथवा अन्य काही प्रकारच्या ग्राहकोपयोगी वस्तू पोहोचत्या करण्याचे प्रयत्न अगदी प्रगत देशांमध्येही आजमितीस प्रायोगिक अवस्थेमध्ये चाचपडत असताना ‘झिप्लाइन’ने ‘ड्रोन’मार्फत रक्तपुरवठा करण्याच्या सेवेचा प्रारंभ रवांडासारख्या देशात यशस्वीपणे कार्यान्वित केला, ही या उपक्रमासंदर्भातील सर्वांत लक्षवेधी बाब होय. रवांडामधील हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर, आता, २०१८ सालापासून आरोग्यविषयक सेवा आणि जिनसा पुरविणारी ‘ड्रोन’चलित यंत्रणा अधिक मोठ्या प्रमाणावर टांझानियात पुरविण्याचा ‘झिप्लाइन’चा मनोदय आहे. रक्तासारख्या जीवनदायक जिनसाचा पुरवठा हमीदारपणे, थेट गरजूंच्या दारात आणि तोही विलक्षण वाजवी खर्चात करणारी अशी ही सेवा अगदी अमेरिकेसारख्या प्रगत आणि आर्थिक व सामरिकदृष्ट्या बलदंड देशाच्या कानकोप-यांत वसणा-या जनसमूहांना मिळण्यात आजही दळणवळणाच्या प्रचंड अडचणी आहेत.

हवाईमार्गाने रक्ताचा पुरवठा करणारे ‘झिप्लाइन’ कंपनीने विकसित केलेले हे ‘ड्रोन्स’ म्हणजे ‘झिप्’ नावाची छोटेखानी विमाने आहेत. कोणत्याही प्रकारच्या हवामानामध्ये उडू शकतील अशा पद्धतीने त्यांची रचना व बांधणी करण्यात आलेली आहे. सरासरी दर ताशी ६२ मैल वेगाने ही विमाने अंतर कापतात. सर्वसाधारणपणे तीन पौंडांपेक्षा किंचित अधिक वजन वाहून नेण्याची त्यांची क्षमता आहे. रुग्णालयातील डॉक्टर अथवा परिचारिका रक्ताची वा औषधांची मागणी कंपनीकडे फोनवरून नोंदविते आणि ‘ड्रोन’ त्या प्रमाणे ‘डिलिव्हरी’ करतात.

‘झिप्लाइन’ या कंपनीचे असे १५ ‘ड्रोन्स’ आज रवांडामध्ये कार्यरत आहेत. दरदिवशी सरासरीने २०० ‘डिलिव्हरीज्’ ते करतात. रवांडातील १२ रुग्णालयांना आज या सेवेचा लाभ मिळतो आहे. येत्या काळात रुग्णालयांची ही संख्या २१पर्यंत वाढविण्याचा कंपनीचा विचार व नियोजन आहे. रवांडा हा त्या मानाने आटोपशीर देश. टांझानियाचे क्षेत्र रवांडाच्या जवळपास ३५ पट मोठे आहे. कंपनीने केलेल्या नियोजनानुसार, टांझानियामध्ये, हवाई आरोग्यसुविधा पुरविणारे ‘ड्रोन्स’ दर दिवसाला सरासरीने दोन हजार ‘डिलिव्हरीज्’करतील. टांझानियातील एक हजारपेक्षा अधिक आरोग्यकेंद्रांना सेवा पुरवली जाईल. सुमारे एक कोटींपेक्षा अधिक लोकसंख्येला ‘ड्रोन’मार्फत केल्या जाणाऱ्या त्या हवाई आरोग्यसुविधेचा लाभ होईल, अशा पद्धतीने रचना करण्यात येत आहे. आजघडीला जगात कार्यरत असलेले या प्रकारचे ते सर्वांत मोठे ‘नेटवर्क’ असेल.

या उपक्रमासाठी तंत्रज्ञान विकसित करणे, हे ‘झिप्लाइन’च्या पुढ्यातील त्या मानाने किरकोळ वा सोपे आव्हान होते. तुलनेने किचकट, बिकट काम होते ते स्थानिक रहिवाशांचा विश्वास संपादन करण्याचे. आकाशात घिरट्या घालून एकदम जमिनीवर काही तरी पाकिट टाकणारे हे विमान नेमके कशासाठी आहे, या संदर्भात जनसामान्यांच्या मनात विपरित धारणा मूळ धरू नयेत, यासाठी कंपनीला विशेष काळजी घ्यावी लागली. कारण, आकाशातून हे विमान टेहेळणी करून हेरगिरी करत असावे, असा बळकट वहिम स्थानिकांना होता. ●●

---

**प्रमुख संदर्भ**

**(A) Books** - :

GOVERNANCE and THE LAW : World Development Report - 2017, A World Bank Group Flagship Report, Washington, DC, 2017.

**(B) Websites**-:

(1) https://www.fastcompany.com/40457183/filled-with-blood-and-medical-supplies-these-delivery-drones-are-saving-lives-in-africa. (2) https://www.imf.org/en/Publication/WEO/Issues/2017/07/07.(3)https://www.un.org/.../2017wesp_chap1_en.pdf.



## भेट अंक योजना

‘अर्थबोधपत्रिका’ या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. ‘अर्थबोधपत्रिका’ आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक ‘भेट अंक’ पाठवू. अंक आवडल्यास त्यांना ‘पत्रिके’चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. ‘अर्थबोधपत्रिके’च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## ‘अर्थबोधपत्रिका’ वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त २०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त ३५० / - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त ५०० / - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ८०० /- रुपये** |

## *ग्रंथालयातील पुस्तके*

# BIHAR
## UNTOLD GROWTH STORY
**by Indra Sen Kumar,**
**Ane Books Pvt. Ltd., New Delhi**
**2017, pp. Vi + 158, Price - Rs. 995/-**

भारतीय आर्थिक सेवेमधून (इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस) निवृत्त झालेल्या एका अधिका-याने लिहिलेल्या या पुस्तकाची कुळकथा मोठी रोचक आहे. एकंदरीनेच, प्राचीन इतिहासाचा वारसा लाभलेले बिहार हे आपल्या देशातील एक राज्य, तेथील राजकारण, बिहारचे अर्थकारण, तिथला समाज यांबद्दल बिहारबाहेरील लोकांमध्ये विपरित समजुतींचाच भरणा अधिक आहे. त्यांतूनच, बिहारसंदर्भात वारंवार केल्या जाणा-या एका कुत्सित, कुचेष्टापूर्वक शे-याने उद्विग्न होऊन प्रस्तुत लेखकाने बिहारचे अंतरंग तटस्थपणे उलगडून मांडणा-या ग्रंथाचा संकल्प प्रशासकीय सेवेमध्ये असतानाच सोडला होता. त्या संकल्पाचे मूर्त स्वरूप म्हणजेच हे पुस्तक. बिहारचा गौरवशाली वारसा आणि इतिहास, अलीकडील काळात तेथे साकारलेले राजकारण, त्यांतून उद्भवलेला आजचा बिहार आणि येत्या काळात बिहारच्या पुढ्यात उभी ठाकणारी आव्हाने यांचा ऊहापोह लेखकाने या ठिकाणी विलक्षण आत्मीयतेने केलेला सापडतो. आजही मुख्यतः शेतीप्रधान असलेली बिहारची अर्थव्यवस्था, औद्योगिक विकाससंदर्भात राज्याची आजवर होत राहिलेली पीछेहाट, त्यांपायी बिहारमधून मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर, बिहारचे राजकारण, राजकारणाच्या तेथील व्यवस्थेने राजकारणी व अनिष्ट प्रवृत्तींचे तिथे घडवून आणलेले साटेलोटे आणि या कडबोळ्याच बिहारच्या आर्थिक विकासक्षमतेवर सातत्याने घडत राहिलेला प्रतिकूल परिणाम...ही सगळीच गुंतागुंत उलगडून मांडणारा हा ग्रंथ अभ्यासकांइतकाच सर्वसामान्य जिज्ञासूंनाही उद्बोधक वाटेल. ●●



RNI Regn.No. MAHMAR/2002/9806
Postal Regn.No.: PCW/115/2016-2018
Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ●'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ●भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ●अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ●इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ●संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

●संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

●अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

### - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**